CMYK


मेरा युवा भारत केंद्र वाशिमच्या वतीने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात >> पान 2

आज मेहकर येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा हस्ते आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्राचे भूमिपूजन >> पान 3

केंद्रीय मंत्री जाधव व आमदार खरात यांच्या विकासाचा अजेंडा; मतदारसंघाचा विकासाला गती देणारा >> पान 4



दैनिक
# आपला विदर्भ


**सुविचार**

दुसऱ्यांचे दुःख समजून घ्या.



बिपाशा बासू पुन्हा प्रेग्नंट आहे? आतील पान


apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 282 ■ सोमवार, दि. 23 जून 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## मुंबईसह कोकणपट्टीवर वादळी पावसाचा अंदाज; किनारपट्टी भागात तीव्र अलर्ट

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या कोकणपट्ट्यात व विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे . मराठवाड्यातही पावसाला पोषक स्थिती असून म ध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची उघडीप आहे . हवामान खात्याने आज रायगड रत्नागिरीसह पुणे घाट परिसरात ऑरेंज अलर्ट दिला आहे . या भागात मुसळधार पावसासह वादळी वारे वाहण्याची ही शक्यता आहे .

मुंबई ,ठाणे, पालघर, नाशिक घाटमाथ्यावर तसेच तळ कोकणात सिंधुदुर्ग सातारा व कोल्हापूर माथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे .या भागांना हवामान विभागाने येलो अलर्ट दिलाय .मराठवाड्यात आज परभणी, हिंगोली आणि नांदेड या तीन जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला असून विदर्भात अमरावती, नागपूर ,भंडारा, चंद्रपूर, आणि गडचिरोली तसेच नंदुरबारमध्येही पावसाचा अलर्ट आहे . पुढील तीन दिवस मध्य म हाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

मराठवाड्यात पावसाला पोषक स्थिती

प्रादेशिक हवामान केंद्र मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार तासात बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे .पुढील तीन दिवस मराठवाड्यात मध्यम ते जोरदार पाऊस होण्याची शक्यता असून दोन दिवसांनी पावसाचा जोर आणखी वाढणार आहे .

किनारपट्टी भागात पावसाचा जोर वाढणार

तळ कोकणापासून ते मुंबई पालघर पर्यंत किनारपट्टी असणाऱ्या भागात पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे .सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड या भागात पुढील तीनही दिवस पावसाचे तीव्र >> पान २



## ‘शिवसेना हायजॅक’ चा प्रस्ताव संजय राऊतांनीच मांडला होता

### मंत्री गुलाबराव पाटलांचा खळबळजनक दावा

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील शिवसेना पक्षात फूट पडून आता ३ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. गेल्या ३ वर्षात दोन्ही शिवसेना पक्षातील नेते एकमेकांवर टीका करत असून निवडणुकांनाही ते सामोर गेले आहेत. आधी लोकसभा, नंतर विधानसभा निवडणुकांमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना पाहायला मिळाला. आता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही तसाच सामना रंगणार आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बाजू खासदार संजय राऊत दररोज म ाध्यमांतून मांडतात. शिवसेना सोडून गेलेल्यांना ते गद्दार म्हणतात, मात्र संजय राऊत हेच सर्वात आधी फुटणार होते. शिवसेना हायजॅक करायचा प्रस्ताव संजय राऊतांनीच अगोदर मांडला होता, असा खळबळजनक दावा राज्याचे मंत्री आणि शिंदेंच्या शिवसेनेतील वरिष्ठ नेते गुलाबराव पाटील यांनी केला आहे.**



>> पान २

## वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली, ॲडमीड न करताच केले उपचार

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोग संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड मागील काही महिन्यांपासून बीडच्या तुरुंगात आहे. कराडवर मोक्का कायदा अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. शनिवारी वाल्मिक कराड याची प्रकृती अचानकपणे बिघडली. यापूर्वी देखील तुरुंगता असताना वाल्मिक कराड याने प्रकृती ठिक नसल्याचे सांगून अनेक कारणे दिली होती. शनिवारी वाल्मिक कराडची तब्येत ठिक नसल्याने वैद्यकीय पथकाने त्याची तपासणी केली होती.



वैद्यकीय पथकाच्या माहितीनुसार वाल्मिक कराड याला मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे वैद्यकीय पथकाने ॲडमीड नकरता त्याच्यावर उपचार केले. यापूर्वी जानेवारी महिन्यात देखील वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे कराड याला ऑक्सिजन लावण्यात आला होता. वाल्मिक कराड याला यापूर्वी अनेकदा मधुमेह आणि उच्च रक्तदाबामुळे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते.

जेल प्रशासनाने तातडीने वैद्यकीय पथकाला याबाबत माहिती दिली. वैद्यकीय पथकाने कारागृहात जाऊन त्याची तपासणी केली, अशी माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली आहे. परंतू वाल्मि क कराड याला श्वासाचा आजार असल्यामुळे त्याच्या विपरीत परिणाम आरोग्यावर झाला नाही. असे वैद्यकीय पथकाने सांगितले. त्यामुळे वैद्यकीय पथकाच्या अहवालानुसार कराडच्या प्रकृतीत किती फायदा होणार आहे ते देखील पाहवं लागणार आहे.

## पत्नी बाहेर जाताच साधला डाव, लोणावळ्यात नराधम बापाचं पोटच्या मुलीसोबत विकृत कृत्य

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे जिल्ह्यातील लोणावळ्यात रक्ताच्या नात्याला काळीमा फासणारी घटना घडली आहे. इथं एका नराधमाने स्वत:च्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपीनं घरात कुणी नसल्याचं बघून मुलीवर जबरदस्ती करत अत्याचार केला. या घटनेची माहिती पीडितेच्या आईला मिळताच, तिने मुलीसह पोलीस ठाण्यात धाव घेतली. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. घटनेचा तपास केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लोणावळ्याच्या जवळील कुसगावमध्ये ही घटना घडली. घटनेच्या वेळी अल्पवयीन मुलगी घरात एकटीच होती. मुलीला एकटं पाहून बापाची नियत बिघडली आणि त्याने तिच्यासोबत गैरकृत्य केले. नराधम एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने ही माहिती कुणाला दिलीस तर ठार म ारेन, अशी धमकीही मुलीला दिली. पण आई घरी आल्यानंतर तिने सगळा प्रसंग आपल्या आईला सांगितला. यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

२० जून रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास अल्पवयीन मुलगी घरी एकटी होती. तिची आई कामानिमित्त बाहेर गेली होती. मुलगी घरी एकटी आहे याचा फायदा घेत आरोपीने मुलीवर बलात्कार केला.

## इराणवर हल्ला केल्यानंतर अमेरिका कमालीची सावध

### न्यूयॉर्क-वॉशिंग्टनमध्ये लष्करी फौजा दाखल



**दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि इस्रायलम धील सुरू असलेल्या संघर्षात आता अमेरिकेने थेट सहभाग घेतला आहे. रविवारी पहाटे अमेरिकेच्या लढाऊ विमानांनी इराणमधील तीन महत्त्वाच्या आण्विक तळांवर जोरदार हल्ला केला, यामुळे मध्यपूर्वेत मोठ्या युद्धाची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्विट करून इराणवरील हल्ल्याची माहिती दिली आहे. तर अमेरिकेने इराणमध्ये केलेल्या आण्विक तळांवरील हवाई हल्ल्यानंतर अमेरिका कमालीची सावध झाली आहे. न्यूयॉर्क आणि वॉशिंग्टन डीसीमध्ये >> पान २

## मोदींची ११ वर्ष विरुद्ध मतचोरींचा आरोप; निवडणूक प्रचार मुद्दे ठरणार

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपुरात सरत्या आठवड्यात राजकीय क्षेत्रात दोन मुद्दे प्रकर्षाने गाजले. सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने ’ म ोदींची ११ वर्ष हे अभियान प्रभावीपणे राबवणे सुरू केले तर त्याला तोडीस तोड काँग्रेसने विधानसभा निवडणुकीतील मत चोरीच्या आरोपाला नव्याने फोडणी देत या मुद्याकडे पुन्हा एकदा लक्ष वेधले.

ज्या पध्दतीने वरील दोन्ही मुद्यांची मांडणी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून केली जात आहे त्यावरून तरी हे मुद्दे आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत प्रचाराचे प्रभावी ठरणार असे दिसते.

स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुका तीन वर्ष टाळणा-या महायुती सरकारला सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे या निवडणुका घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. या निवडणुकांची तारीख अद्याप ठरली नसली तरी लोकसभा, विधानसभा निवडणुकीतील निवडणूक आयोगाचा सरकार धर्जीणेपणा



लक्षात घेतला तर या निवडणुकांची तारीख सरकारच्या सोयीने ठरवली जाण्याचीच शक्यता अधिक आहे. खरच या निवडणुका होतील का? अशी शंकाही माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केली आहे. असे असले तरी भाजपने निवडणूक तयारी सुरु केली आहे

मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारला ११ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भाजपने केंद्राच्या योजनांच्या प्रचाराची व्यापक मोहीम हाती घेतली. संवाद सभा, जनता दरबार, नेत्यांच्या मुलाखती आणि बरेच काही असे त्याचे स्वरूप आहे. यामुळे कार्यकर्तांना काम मिळाले, त्याचा फायदा भाजपला निवडणुकीत होण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे काँग्रेसने पुन्हा विधानसभा निवडणुकीतील मत चोरीचा मुद्दा पुढे केला आहे. त्याला कारण ठरले ते अलिकडेच केंद्रीय निवडणूक आयोगाने काढलेले पत्र. निवडणुकीनंतर ४५ दिवसात मतदानाच्या संदर्भातील सर्व सीसीटीव्ही फुटेज नामशेष करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले. चणाक्ष काँग्रेसने ही बाब हेरून त्यांनी केलेल्या मत घोटाळ्याच्या आरोपाशी या पत्राची सांगड घालून मत चोरी लपवण्यासाठीच नियमावली बददली, असा थेट आरोप केंद्रीय निवडणूक आयोगावर केला. यासाठी प्रदेश काँग्रेसने नागपूरची निवड केली. प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष नाना पटोले यांनी नागपूरला येऊन पत्रकार परिषदेत निवडणूक >> पान २

## आता आमची वेळ, पहिला हल्ला तुम्ही केलात, पण, इराणचा अमेरिकेला इशारा

**तेहरान/वृत्तसंस्था :** गेल्या दहा दिवसांपासून इराण आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या लष्करी संघर्षात आता अमेरिकेने थेट सहभाग घेतला असून, इराणम धील तीन अणु प्रकल्पांवर हवाई हल्ले केले आहेत. अमेरिकेच्या या हल्लयांनंतर काही तासांतच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी कोणताही विलंब न करता बदला घेणार असल्याचा इशारा दिला आहे.

अयातुल्ला अली खामेनी यांचे प्रतिनिधी हुसेन शरीयतमदारी यांनी इराणी माध्यमांना सांगितले की, पहिले पाऊल म्हणून ते बहरीनमधील अमेरिकन नौदलाच्या ताफ्यावर क्षेपणास्त्र हल्ला करतील आणि होर्मुझचा सागरी मार्ग बंद करतील.

’’आता विलंब न करता कारवाई करण्याची आमची वेळ आहे. पहिले पाऊल म्हणून, आम्ही बहरीनमधील अमेरिकन नौदलाच्या ताफ्यावर >> पान २

## अबुल आझमी यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर मुख्यमंत्री भडकले; अबु आझमी फाल्तू माणूस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात आषाढी वारीचा उत्साह, वारीत अत्यंत आनंदाचे वातावरण आहे. लाखो भाविक वारीत सहभागी होत आहेत. तर दुसरीकडे समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी आषाढी वारीबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. ‘‘वारीमुळे रस्ता जाम होतो. हिंदूंचे सण साजरी केले जातात तेव्हा मुस्लीम व्यक्ती तक्रार करत नाही. मात्र मुस्लीमांच्या नमाजाच्या वेळी तक्रार करतात‘‘, असं वक्तव्य अबू आझमी यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत अबुल आझमी हे फालतू माणूस असल्याची टिका केली आहे. अबू आझमी म्हणाले होते की, मशिदीबाहेर नमाज पठण करु शकत नाही. आम्ही



कुणाची तक्रार करत नाही आहोत. आम्ही आमच्या हिंदू बांधवाच्या सोबत खांद्याला खांदा लावून चालतो. आजपर्यंत कधीही कुठल्या मुसलमानाने ही तक्रार केली नाही की, रस्त्यावर उत्सव का साजरी केला जातो? मी पुण्याहून येत होतो. तेव्हा मला लोकांनी सांगितलं की, पालखी जाणार आहे. त्यामुळे लवकर जा. नाहीतर रस्ता जाम होईल. रस्ता जाम होत आहे. पण आम्ही कधी विरोध केला नाही. आमच्या नमाज पठणाच्या वेळी जाणीवपूर्वक या देशात मुसलमानांसाठी जमीन कमी केली जात आहे‘‘, असं वादग्रस्त अबू आझमी यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काय म्हणाले की, अबू आझमी यांना वादग्रस्त विधानं करण्याचा शौक आहे. कारण त्यांना असं वाटतं की, वादग्रस्त विधानं केली की, प्रसिद्धी जास्त मिळते. त्यामुळे मी त्यांना प्रसिद्धीच्या लायक समजत नाही. त्यामुळे मी अशा फाल्तू गोष्टीला उत्तर देणार नाही‘‘, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### नागपुरातील बैठकीत महत्वाचे निर्णय

दरम्यान, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित आज नागपुरात महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत काय निर्णय घेण्यात आले याबाबत मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली. ‘‘नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये २०२७ मध्ये जो महाकुंभ मेळावा आयोजित करण्यात येणार आहे, त्यासाठी रस्त्यांचं नेटवर्क तयार व्हावे या दृष्टीने मी राष्ट्रीय महामार्ग बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले होते. त्याच अनुषंगाने आज केंद्रीय रस्ते-वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी बैठक घेतली. या बैठकीत आम्ही आठ-नऊ रस्त्यांची मागणी केली होती. ते सर्व रस्ते त्यांनी मंजूर केले आहेत. त्यामध्ये रिंगरोड, त्र्यंबकेश्वरला जाणारा रस्ता आणि सहा बाजूने नाशिकच्या दिशेला रस्ते येतात. त्या सर्व रस्त्यांच्या कामकाजांनादेखील त्यांनी मान्यता दिली आहे‘‘, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

CMYK

## अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे

आज २३ जून, आपल्या मधुर आवाजाने रसिकांच्या हृदयात स्थान मिळवणारे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांचा स्मृतिदिन. प्रल्हाद शिंदे यांना भक्ती गीतांचा बादशहा म्हंटले जाते कारण त्यांनी गायलेली सर्व भक्तिगीते लोकप्रिय झाली. केवळ भक्तिगीते नाही तर भावगीते, कव्वाली आणि कोळी गीतांवर देखील ठसा उलटवला. सर्व प्रकारची लोक गीते गाण्याचा आणि ती लोकगीते लोकप्रिय करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात कोणताही सण उत्सव असो त्यांनी गायलेली गाणी वाजवल्या शिवाय तो सण उत्सव पूर्ण होतच नाही. मग तो गणपती उत्सव असो की नवरात्र उत्सव, आषाढी एकादशी असो की सत्यनारायणाची महापूजा, आंबेडकर जयंती असो की बुद्ध पौर्णिमा इतकेच काही गावातील संदल उरूस देखील त्यांच्या कव्वाली शिवाय पूर्ण होत नाही कारण त्यांनी गायलेली ऐका सत्य नारायणाची कथा, चल ग सखे पंढरीला, बाप्पा मोरया रे, उड जायेगा एक दीन पंछी रहेगा पिंजरा खाली.... अशी गायलेली शेकडो गाणी आजही लोकप्रिय आहे. ही गाणी अजरामर आहेत. ही गाणी ऐकली नाहीत असा एकही माणूस महाराष्ट्रात शोधूनही सापडणार नाही. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वानाच ही गाणी तोंडपाठ आहेत. केवळ हीच नाही तर यासारखी शेकडो लोकप्रिय गाणी गाऊन त्यांनी रसिकांच्या हृदयात स्थान मिळवले आहे. १९३३ साली सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा गावात त्यांचा झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भगवानराव तर आईचे नाव सोनाबाई असे होते. त्यांना दोन मोठे भाऊ होते. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने प्रल्हाद शिंदे यांचा परिवार ते लहान असतानाच मुंबईत आले. गोड गळ्याची दैवी देणगी लाभलेल्या प्रल्हाद शिंदे यांनी लहान वयातच मुंबईच्या रस्त्यांवर रेल्वे स्टेशनवर गाणी गायला सुरुवात केली. त्यांची आई भाऊही गाणी गाऊन त्यांना साथ देऊ लागली. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होऊ लागला. अतिशय गरीब घराण्यात जन्म घेतलेला, बहुजन समाजात जनमलेला, गायनाचे किंवा संगीताचे कोणतेही शिक्षण न घेतलेल्या प्रल्हाद शिंदे यांचा आवाज मुंबईत लोकप्रिय होऊ लागला. त्यांची गाणी जशी लोकप्रिय होऊ लागली तशी त्यांच्या आवाजाची जादू महाराष्ट्रभर पसरू लागली. गावागावातून त्यांना गाणी गाण्यासाठी बोलावणे येऊ लागले. नवरात्र उत्सव, आंबेडकर जयंती, गावातील यात्रा, जत्रा, बुद्ध पौर्णिमा, संदल – उरूस अशा कार्यक्रमात त्यांना बोलावणे येऊ लागले. त्यांची गाणी ऐकण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागली. पाहता पाहता त्यांचा आवाज महाराष्ट्रभर पसरला. महाराष्ट्रातील ते सर्वाधिक मागणी असलेले गायक बनले. उभ्या महाराष्ट्रात पायाला भिंगरी लावल्यासारखे ते गाण्यासाठी भटकले. त्यामुळे त्यांनी माणसे जोडली आणि ते जाती धर्माच्या पलीकडे जाऊन पोहचले. प्रल्हाद शिंदे आपल्या गाण्याच्या कार्यक्रमाचा शेवट नेहमी एका आगळ्या वेगळ्या गीताने करीत. त्यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. भजन, कीर्तन, लोकगीते, बुद्ध धर्माची गाणी, डॉ बाबासाहेबांची गाणी त्यांनी घराघरात पोहचवली. त्यांची गाणी इतकी लोकप्रिय झाली की लोकांनी त्यांना डोक्यावर घेतले. प्रल्हाद शिंदे यांनी गायनाचा धंदा केला नाही म्हणून त्यांना कधीही आर्थिक स्थैर्य मिळाले नाही पण त्यांच्या गाण्यांमुळे कॅसेट कंपन्या मात्र गब्बर झाल्या. २३ जून २००३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, चंद्रकांत शिंदे या मुलांनी जपली तीच परंपरा त्यांची नातवंडं देखील जपत आहे. आज शिंदे घराणे हे संगीत क्षेत्रातले ब्रँड बनले आहे याचे सर्व श्रेय प्रल्हाद शिंदे यांना जाते. मधुर गळ्याचे अजरामर लोक गायक प्रल्हाद शिंदे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# मेरा युवा भारत केंद्र वाशिमच्या वतीने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

### सामूहिक योगाला नागरिकांचा मोठा सहभाग, नेहरू युवा मंडळ व राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा विशेष सहकार्य

**वाशिम /प्रतिनिधी :** २१ जून योग ही भारताची प्राचीन आणि अमूल्य देणगी आहे. योग कर्मसु कौशलम्‌ या भगवद्गीतेतील शिकवणीनुसार योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून, ती आरोग्य, समतोल आणि मानसिक शांती प्राप्त करण्याची जीवनशैली आहे. एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग या २०२५ सालच्या संकल्पनेनुसार वाशिम शहरातील वाटाणे लॉन येथे उत्साहात संपन्न झाला. आयुष मंत्रालय, भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, युवा कार्यक्रम व खेल मंत्रालय भारत सरकार सलग्नित मेरा युवा भारत केंद्र वाशिम कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत विधानपरिषद सदस्य आमदार किरणराव सरनाईक बोलत होते . याप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस.परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा, तहसीलदार निलेश पळसकर, शिक्षणाधिकारी आकाश आहाळे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर भोंडे, क्रीडा अधिकारी मारोती सोनकांबळे, मेरा युवा भारत केंद्र स्वयंसेवक प्रदिप पट्टेबहादूर,दत्ता मोहळे आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे योगप्रशिक्षक डॉ. हरिष बाहेती, आयुष विभागाच्या योग थेरपीस्ट तेजस्विनी माणिकराव,पतंजली योगसमितीचे डॉ.भागवत वानखेडे, पतंजली महिला योग समितीच्या दिपा वानखेडे, राजा प्रसेनजीत संस्था स्वयंसेविका वैष्णवी पानझडे आदींचा समावेश होता.

यावेळी उपस्थितांना आमदार




किरणराव सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रतिज्ञा देण्यात आली. योग दिनाच्या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, क्रीडा पुरस्कारार्थी, जिल्हा युवा पुरस्कारावरती, खेळाडू मार्गदर्शक, युवा मंडळ,स्काउट्स गाइड, एन एस एस, एनसीपी, योगसाधक,नागरिक, महिला, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, पोलीस कर्मचारी तसेच अनेक सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सदर कार्यक्रम हा मीरा युवा भारत केंद्र जिल्हा युवा अधिकारी सारंग मेश्राम व लेखा अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला असून यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांचे विशेष सहकार्य लाभले.

पान १ वरून...

### मुंबईसह कोकणपट्टीवर

अलर्ट देण्यात आले असून सोमवारी या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट आहे .पुणे, सातारा, कोल्हापूर व नाशिक घाट परिसरात पावसाचे येलो अलर्ट देण्यात आले आहेत . पुढील दोन दिवसात विदर्भ मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातही पावसाचा जोर वाढणार असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे ..कल्याण, डोंबिवली व पालघर भागात मेघगर्जनेसह ढगांची संख्या ४.५ किमी पर्यंत असल्याचे दिसून आले आहे. पुढील २.३ तासांत मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजावर लक्ष ठेवा. असा इशारा हवामान विभागानं दिलाय. राज्यभरात दोन ते तीन अंशांनी कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे प्रादेशिक हवामान केंद्राने सांगितलं .कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील दोन दिवसात तापमानात फारसा परिणाम होणार नाही .विदर्भात तापमान दोन ते तीन अंशांनी घसरेल असा अंदाज आहे .

### ‘शिवसेना हायजॅक’ चा प्रस्ताव

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या बंडाच्या वेळी संजय राऊत यांनाही सोबत गुवाहटीला यायचे होते. मात्र, सोबतच्या आम दारांनी संजय राऊतांना कडाडून विरोध केला. त्यामुळे राऊत यांना सोबत घेतलं नाही आणि हीच त्यांची मोठी पोटदुखी आहे, असा खळबळजनक दावा काही दिवसांपूर्वी शिवसेना शिंदे गटाचे नेते शहाजी बापू पाटील यांनी केला होता. जर असल्या पूजा करून कोण निवडून येत असतं तर आम्हाला काय कवट्या मिळत नाहीत का? सुया मिळत नाहीत का? हे सगळं थोतांड आहे, असे सांगत मंत्री भरत गोगावलेंची पाठराखण ही त्यांनी केली होती. दरम्यान, संजय राऊतांकडून शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांवर दररोज शाब्दिक हल्ले चढवले जातात. पक्षफुटीवरुन जोरदार टीका केली जाते. मात्र, आता शहाजी बापू पाटील यांच्यानंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी देखील संजय राऊतांबद्दल खळबळजनक दावा केला आहे.

शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव संजय राऊतांनीच दिला

शिवसेना पक्षात फूट पडल्यानंतर सर्वात आधी संजय राऊत फुटणार होते. शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव संजय राऊत यांनीच एकनाथ शिंदे यांच्याकडे मांडला होता, असा खळबळजनक गौप्यस्फोट मंत्री गुलाबराव पाटील यांनी केला आहे. गुवाहटीतील काय झाडी, काय डोंगार, काय हाटील फेम शिवसेना नेते शहाजी बापू पाटील यांच्या वक्तव्याच्या संदर्भाने विचारलेल्या प्रश्नावरुन आता गुलाबराव पाटील यांनीही खळबळजनक वक्तव्य केलं आहे. शिवसेना फुटली त्यावेळेस सर्वात आधी संजय राऊत फुटणार होते, मात्र ३५ ते ३६ आमदारांनी त्यांना विरोध केला, असे शहाजी बापू पाटील यांनी म्हटले. आता, मंत्री गुलाबराव पाटील यांना देखील शहाजी बापूंची री ओढली आहे. शिवसेना हायजॅक करण्याचा प्रस्ताव संजय राऊत यांनीच एकनाथ शिंदे यांच्याकडे मांडला होता. मात्र, ते त्यावेळेस थांबले, संजय राऊतच सर्वात पहिले फुटणार होते, असे गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे.

### इराणवर हल्ला केल्यानंतर

धार्मिक, सांस्कृतिक स्थळांवर लष्करी फौजा दाखल झाल्या असून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

याबाबत छधझऊ(न्यूयॉर्क पोलीस विभाग) यांनी या एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे की, आम्ही इराणमध्ये घडत असलेली परिस्थिती बारकाईने पाहत आहोत. अतिरिक्त सतर्कतेच्या दृष्टिकोनातून, न्यूयॉर्क शहरातील धार्मिक, सांस्कृतिक आणि इतर महत्त्वाच्या स्थळांवर आम्ही अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. आम्ही आमच्या फेडरल भागीदारांसोबत समन्वय ठेवत आहोत आणि परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत.

तर वॉशिंग्टन डीसीतील मेट्रोपोलिटन पोलिस विभागाने देखील याबाबत आपली प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही इराणमधील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत. स्थानिक, राज्य आणि फेडरल यंत्रणांसोबत समन्वय ठेवत आमचे नागरिक, व्यवसाय आणि पर्यटक सुरक्षित राहतील, यासाठी आम्ही सतत गुप्तचर माहितीचे परीक्षण करत आहोत, असे वॉशिंग्टन डीसीतील मेट्रोपोलिटन पोलिस विभागाने म्हटले आहे. सध्या वॉशिंग्टन डीसीवर कोणताही धोका नाही. मात्र, शहरातील विविध धार्मिक स्थळांवर आधीपासूनच वाढीव बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. नागरिकांनी सतर्क राहून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

इराणमध्ये नेमके काय घडले?

अमेरिकेने रविवारी पहाटे इराणमधील तीन आण्विक तळांवर हल्ले केले. यामुळे अमेरिका थेट इराण-इस्रायल संघर्षात उतरल्याचे स्पष्ट झाले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमधून देशाला संबोधित करत सांगितले की, इराणची महत्त्वाची आण्विक तळं पूर्णपणे नष्ट करण्यात आली आहेत. तर इराणने यावर तीव्र प्रतिक्रिया देत अमेरिकेवर आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केल्याचा आरोप केला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री सैयद अब्बास अराघची म्हणाले, अमेरिकेने आमच्या आण्विक तळांवर हल्ला करून णछ चार्टर, आंतरराष्ट्रीय कायदे आणि अण्वस्त्र प्रतिबंध कराराचा भंग केला आहे. आमच्यावर झालेला हा हल्ला गंभीर असून आम्हाला आमची स्वतःची सुरक्षा करण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

### मोदींची ११ वर्ष विरुद्ध

आयोग आणि पर्यायाने भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर टीका केली. यापूर्वी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधीं यांनी वाढीव मतदार नोंदणीवर आक्षेप नोंदवताना जिल्ह्यातील कामठी विधानसभा मतदारसंघाचे उदाहरण दिले होते. या मतदारसंघातून भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे विजयी झाले आहेत. येथून पराभूत झालेले काँग्रेस उमेदवार सुरेश भोयर यांनी तर मतदानाच्या तीन दिवसापर्यंत कशी मतदार नोंदणी सुरू होते हे सांगितले होते. त्यावर भाजपने प्रतिउत्तर दिले. निवडणूक आयोगाला विचारलेल्या प्रश्नाला भाजप नेते उत्तर देऊ लागल्याने ते अडचणीत सापडले. त्यामुळे यावेळी भाजपने ही चूक केली नाही.पटोलेंनी गंभीर आरोप केल्यानंतर अद्याप भाजप नेत्यांनी त्यावर प्रतिक्रिया दिली नाही. मात्र यामुळे मत चोरीचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला. भाजपच्या बलाढ्य प्रचार यंत्रणेला तोंड कसे द्यायचे, असा प्रश्न काँग्रेसपुढे होता. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नव्या आदेशाने या पक्षाचे काम हलके केले.

### आता आमची वेळ

क्षेपणास्त्र हल्ला केला पाहिजे आणि त्याच वेळी अमेरिकन, ब्रिटिश, जर्मन आणि फ्रेंच जहाजांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी (दोन जलाशयांना जोडणारा अरुंद मार्ग) बंद केली पाहिजे,'' असे शरीयतमदारी यांनी म्हटल्याचे वृत्त इराण इंटरनॅशनलने दिले आहे.


दरम्यान, इराणने यापूर्वीही अनेकदा होर्मुझची सामुद्रधुनी रोखण्याची धमकी दिली आहे, परंतु त्यांनी कधीही ती प्रत्यक्ष रोखली नाही.

होर्मुझची सामुद्रधुनी ओमान आणि इराणमध्ये आहे. ती उत्तरेकडील आखाताला दक्षिणेकडील ओमानच्या आखाताशी आणि पलीकडे अरबी समुद्राशी जोडते. या सामुद्रधुनीतून जगातील तेलाची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. ओपेक सदस्य असलेले सौदी अरेबिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कुवेत आणि इराक हे त्यांचे बहुतेक कच्चे तेल या सामुद्रधुनीतून निर्यात करतात, प्रामुख्याने आशियामध्ये. बहरीनस्थित अमेरिकेच्या पाचव्या फ्लीटवर या क्षेत्रातील व्यावसायिक वाहतुकीचे संरक्षण करण्याचे काम सोपवण्यात आले आहे.

# जागतिक तेल धमनी बंद करण्याकरिता इराणने टाकले पहिले पाऊल, भारतासह संपूर्ण जगापुढं निर्माण होणार संकट

**हैदराबाद/वृत्तसंस्था :** अमेरिकेनं इराणमध्ये घुसून हल्ला केल्यानंतर संतप्त झालेल्या इराणनं संपूर्ण जगावर परिणाम होईल, असा निर्णय घेतला आहे. इराणच्या संसदेनं होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यास मान्यता दिली आहे. असे असले तरी त्याबाबतचा अंतिम निर्णय इराणची सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषद घेणार आहे.

इस्रायलच्या हल्ल्यानंतर इराणनं होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याची दिलेली धमकी आता खरी करण्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. होर्मुझचा हा धोरणात्मक जलमार्ग जगातील सर्वात महत्त्वाचा तेल वाहतूक अडथळा आहे. इराणच्या संसदेनं इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्याचा बदला म्हणून होर्मुझची सामुद्रधुनी वाहतुकीसाठी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सागरीमार्गानं होणाऱ्या व्यापारावर



निर्बंध येऊ शकतात. तसेच जागतिक तेलाच्या किमतीवर परिणाम होऊ शकतो.

ओमान आणि इराण दरम्यान होर्मुझची सामुद्रधुनी आहे. ही सामुद्रधुनी पर्शियन आखाताला ओमानच्या आखात आणि अरबी समुद्राशी जोडते. होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची तेल वाहतूक केंद्र आहे. कारण या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात म्हणजे जागतिक कच्च्या तेलाच्या व्यापाराच्या सुमारे १०० टक्के जागतिक तेल वाहतूक होते. होर्मुझची सामुद्रधुनी त्याच्या सर्वात अरुंद बिंदूवर अंदाजे १६१ किलोमीटर लांब आणि ३३ किलोमीटर रुंद आहे. दोन्ही दिशेनं शिपिंग लेन फक्त तीन किलोमीटर रुंद आहेत.

#### नाकाबंदीचे काय आहेत संभाव्य जागतिक परिणाम

या महत्त्वाच्या सामुद्रधुनीचा मार्ग बंद केला तर जलमार्गातून कच्च्या तेलाच्या वाहतुकीत तात्पुरता अडथळा येऊ शकतो. मात्र, पर्यायी मार्गामुळे जागतिक ऊर्जेच्या किमतीमध्ये झपाट्याने वाढ होऊ शकते. तसेच जलवाहतुकीच्या खर्चात वाढ आणि पुरवठा होण्यासाठी अधिक वेळ लागू शकतो. तज्ज्ञांच्या माहितीनुसार सामुद्रधुनीच्या नाकाबंदीमुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १०० डॉलर्सच्या पुढे जाऊ शकतात.सामुद्रधुनी बंद झाल्यास आखातातून पेट्रोल आयात न करणाऱ्या देशांनाही मोठा फटका बसू शकतो. कारण पुरवठ्यात मोठी घट आणि जलवाहतुकीला लागणाऱ्या वेळेमुळे जागतिक बाजारात प्रति बॅरल किंमत वाढण्याची दाट शक्यता आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज सुमारे २० दशलक्ष बॅरल तेल आणि तेल उत्पादनांची वाहतूक केली जाते. यूएस एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशन नुसार, २०२२ मध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीतून दररोज सरासरी २.१ कोटी बॅरल तेल वाहतूक झाली. ओपेक सदस्य असलेल्या सौदी अरेबिया, इराण, संयुक्त अरब अमिराती, कुवेत आणि इराक त्यांचे बहुतेक कच्चे तेल या सामुद्रधुनीतून निर्यात करतात. त्याचबरोबर जगातील एक तृतीयांश द्रवस्वरुपातील नैसर्गिक वायूची या जलमार्गातून वाहतूक होते. या सामुद्रधुनीला जगाची तेल धमनी म्हटलं जातं.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### देशपांडेंनी ताटातला चमचा म्हणताच राऊत भडकले, ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाआधीच मिठाचा खडा?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चेदरम्यान, संजय राऊत आणि संदीप देशपांडे यांच्यात वाकयुद्ध सुरू झाले आहे. संदीप देशपांडे यांनी राऊतांना ताटातला चमचा म्हटल्यानंतर राऊतांनी देशपांडे यांच्यावर जोरदार टीका केली. राजकारणात संयम महत्त्वाचा असतो, उथळपणा करून चालत नाही, असं राऊत म्हणाले. या वाकयुद्धामुळे युतीच्या चर्चांना वेगळे वळण लागले आहे. मुंबई: गेल्या काही दिवसांपासून मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चांना उधाण आले असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत आणि मनसेचे मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे यांच्यात खडाजंगी सुरू आहे.

मनसे आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या युतीबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. दोन्ही पक्षांतील नेते युतीबाबत सकारात्मक दिसत आहेत. मात्र, मनसे नेते संदीप देशपांडे आणि ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यातील वाकयुद्धामुळे युतीच्या चर्चांना वेगळे वळण लागले आहे.संदीप देशपांडे यांनी ठाकरे बंधूंच्या युतीच्या चर्चे वरून संजय राऊतांवर निशाणा साधला होता. त्यांनी राऊतांना ताटातला चमचा म्हटले होते. युतीबद्दल दोन्ही पक्षप्रमुख निर्णय घेतील, ताटातल्या चमच्याने ताटात राहावे, असे देशपांडे म्हणाले होते. त्यामुळे देशपांडे व राऊत च्या यांच्यात वाक् युद्ध निर्माण झाले असून ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाआधीच मिठाचा खडा पडला आहे. याबाबत मात्र राजकीय वर्तुळा चांगलीच चर्चा रंगत आहे.

### दुसऱ्या दिवशी सिराजची मोठी चूक; भारतासाठी ठरला व्हिलन, केले संघाचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या टेस्ट सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीय संघ चांगल्या स्थितीत वाटत होता. जसप्रीत बुमराहच्या जबरदस्त सुरुवातीनं इंग्लंडला दबावात आणलं होतं, पण मोहम्मद सिराजच्या एका निर्णयाम ुळे भारताच्या सर्व प्रयत्नांवर पाणी फिरल्याचं चित्र उभं राहिलं. भारताने पहिल्या डावात ४७१ धावा केल्या आणि इंग्लंडला कठीण लक्ष्य दिलं. बुमराहने पहिल्याच षटकात झॅक क्राऊलीला बाद करत चाहत्यांना सेलिब्रेशनची संधी दिली. इंग्लंडने फक्त ४ धावांवर पहिला विकेट गमावला आणि भारताच्या चाहत्यांना वाटलं की, आता इंग्लंड बॅक्फफूटवर जाईल. पण दुसऱ्याच षटकात शुभमन गिलने बॉल दिला मोहम्मद सिराजला आणि इथेच सगळा खेळ बदलला.

सिराजने त्याच्या षटकात दोन चौकार दिले. त्यानंतर पुन्हा एकदा बुमराहने अचूक बॉल टाकून इंग्लंडवर दबाव टाकला. पण जेव्हा सिराज पुन्हा चौथ्या षटकात गोलंदाजीला आला, तेव्हा पुन्हा दोन चौकार झेलावे लागले. सिराजच्या स्वैर माऱ्यामुळे बुम राहच्या आक्रमक माऱ्यावरचा प्रभावही कमी झाला. गिलने त्यानंतर लगेचच सिराजची ओव्हर थांबवली, पण तोवर इंग्लंडचे फलंदाज आत्मविश्वासाने खेळू लागले होते. इंग्लंडवरचं सुरुवातीचं दडपण हळूहळू हटत गेलं आणि त्यांनी आक्रमक शैलीने फलंदाजी करत धावांचा वेग वाढवला. जिथं बुमराह इंग्लंडच्या फलंदाजांना अडचणीत टाकत होता, तिथं सिराजने त्यांना फटकेबाजीची मोकळीक दिली. यामुळे केवळ इंग्लंडची रनगती वाढली. मोहम्मद सिराजने आक्रमक गोलंदाजीचा प्रयत्न केला खरा, पण त्यात अचूकतेचा अभाव होता. परिणामी, इंग्लंडने दुसऱ्या दिवशी मोठी धावसंख्या उभारत सामना पुन्हा बरोबरीत आणला. जर सिराजने त्या क्षणी अचूक मारा केला असता, तर कदाचित भारताची पकड दुसऱ्या दिवशी मजबूत राहिली असती.

### ज्याची भीती होती तेच घडलं! भारताच्या कृषीसह या क्षेत्रांना सर्वात मोठा फटका बसण्याची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण आणि इस्रायलमधील संघर्षाने आता आंतरराष्ट्रीय स्वरूप घेतले असून, अमेरिका देखील या संघर्षात सक्रियपणे सहभागी झाली आहे. या घटनाक्रमामुळे पश्चिम आशियातील स्थैर्य धोक्यात आले असून, त्याचा थेट व अप्रत्यक्ष परिणाम भारतासारख्या विकसनशील देशांवर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषत: भारताच्या कृषी क्षेत्र, ऊर्जा सुरक्षा, विदेश व्यापार, चलनवाढ आणि शेअर बाजारावर याचा परिणाम जाणवू शकतो.

भारताचे कृषी क्षेत्र अजूनही मोठ्या प्रमाणावर इंधनाच्या दरांवर अवलंबून आहे. युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली, तर डिझेलचे दर वाढतील, ज्याचा थेट फटका सिंचन, ट्रॅक्टरसारखी यंत्रसामग्री आणि माल वाहतुकीच्या खर्चावर होतो. परिणामी, उत्पादन खर्च वाढून शेतकऱ्यांचे नफा मार्जिन घटू शकते. तसेच खते, कीटकनाशके आणि इंधनावर होणारा खर्च वाढल्यास त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर होऊ शकतो. परिणामी, अन्नधान्य महागाई निर्माण होऊन सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार येण्याची शक्यता आहे.

# आज मेहकर येथे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा हस्ते आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्राचे भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

## शालेय विद्यार्थ्यांना स्कुल बॅग,दिव्यांगांना साहित्य वाटप तसेच आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

**मेहकर/प्रतिनिधी :** केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते महाराष्ट्रातील तिसरे आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्राचे भूमिपूजन आणि जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा असलेली स्कुल बॅग , दिव्यांगांना साहित्य वाटप आणि एसबीआय फाउंडेशन अंतर्गत एस बी आय एफ जीवन सुरक्षा आरोग्य तपासणीचे उदघाटन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात २३ जूनला करण्यात आले आहे.



केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची जन्मभूमी असलेल्या मेहकर तालुक्यातील मादणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत २३ जून रोजी होणाऱ्या प्रवेशोत्सव सोहळ्याला मंत्री प्रतापराव जाधव उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत त्यानंतर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना संपूर्ण गणवेश वाटप पुस्तक वाटप आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीच्या मदतीने अवंत फाउंडेशन मार्फत आधुनिक सुविधा असलेल्या स्कूल बॅगचा वाटप शुभारंभ होणार आहे जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील १६ हजार विद्यार्थ्यांना ही आधुनिक सुविधा असलेली स्कूल बॅग मोफत देण्यात येणार आहे.

आरोग्य संशोधन विभाग , केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालय आणि एडस संशोधन संस्थेअंतर्गत मेहकर येथे ५.६ कोटी रुपयांचे आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्र उभारण्यात येणार आहे . या केंद्राचा पायाभरणी समारंभ केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते ग्रामीण रुग्णालय मेहकर येथे होणार आहे त्यानिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी भवन येथे करण्यात आले या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार संजय रायमुलकर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी गुलाबराव खरात मेथियस बेंगस्टन प्रथम सचिव व्यापार धोरण आणि आर्थिक कार्य, डेन्मार्क एस बीआयचे राजाराम चव्हाण शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा बळीराम मापारी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी जाधव महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळुकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव भागवान सुलताने पाटील शहर प्रमुख जयचंद भाटिया याच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत याच कार्यक्रमात एस बीआय फाउंडेशन द्वारा एस बी आय एफ जीवतम सुरक्षा अंतर्गत नागरीकांच्या आरोग्य तपासणीचे उद्घाटन मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

पहिल्या टप्प्यात बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर मोताळा चिखली खामगाव जळगाव जामोद या पाच तालुक्यांतील प्रत्येक ५ हजार अशा पंचवीस हजार नागरीकांच्या १७ प्रकारच्या आरोग्य तपासण्या या अंतर्गत करण्यात येणार आहे आणि ॲलिम्को अंतर्गत दिव्यांग बांधवांना कृत्रिम अवयव वाटप शुभारंभ मंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती कार्यालयात विशेष शिबिरव्दारे या साहित्याच वाटप दिव्यांग बांधवांना करण्यात येणार आहे मेहकर येथील भुमिपुत्र शेतकरी भवन येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आय सी एम आर , हिंदुस्तान पेट्रोलियम , अवंत फाउंडेशन,ॲलिम्को ,एस बी आय फाउंडेशनच्यावतीने करण्यात आले आहे.

## घरात घुसून तरुणीला बेदम मारहाण, शेजाऱ्याने डोक्यात घातला दगड

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्याच्या ऐरोली परिसरातील जुना चिंचपाडा परिसरात एका महिलेला बेदम मारहाण करण्यात आली आहे. आरोपीनं घरात घुसून मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी देखील दिली. निशा वाघेला (२५) असं मारहाण झालेल्या तरुणीचं नाव आहे. ती जुना चिंचपाडा परिसरात बहीण आणि भाचीसह वास्तव्याला आहे. शुक्रवारी २० जून रोजी सकाळी ६.३० वाजता घरात कुणी नसताना शेजाऱ्याने निशाला मारहाण केली. याबाबत रबाळे श्ध्ऊणब पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक चौकशी सुरू असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, निशा वाघेला यांच्या घरात त्यांचा पाळीव श्वान आहे. घटनेच्या दिवशी शुक्रवारी पहाटे निशा वाघेला घरात लादी पुसत होत्या. यावेळी अचानक मनोज नावाचा इसम त्यांच्या घरासमोर आला. ''तुम्हारा कुत्ता मेरे घर के सामने गंदगी करता है, उसको संभालो नही तो तुमको मैं मार डालूंगा'' असे बोलू लागला. त्यावेळी निशा यांनी ''तू असे का बोलत आहेस, हवं तर मी घाण साफ करते'' असं सांगितलं आणि त्या घरात जाऊ लागल्या.

# बिपाशा बासू पुन्हा प्रेग्नंट आहे?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बिपाशा बासू बऱ्याच काळापासून मोठ्या पडद्यापासून दूर आहे. पण ती सोशल मीडियावर सक्रिय असते. त्यामाध्यमातून ती चाहत्यांना अपडेट देत असते. ती अनेकदा तिचा पती करण सिंग ग्रोव्हर आणि मुलगी मालतीसोबतचे तिचे फोटो आणि व्हिडिओ शेअर करत असते. तसेच बिपाशाला तिच्या वाढलेल्या वजनामुळे देखील अनेकदा ट्रोलही करण्यात आलं. आताही तिचा एक व्हिडीओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होताना दिसत आहे.

हा व्हिडीओ पाहून बिपाशाचे चाहते देखील आश्चर्यचकित आणि गोंधळले आहेत. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर, बहुतेक लोक असा अंदाज लावत आहेत की बिपाशा दुसऱ्यांदा आई होणार आहे. व्हिडिओमध्ये बिपाशासोबत करण सिंग ग्रोव्हर आणि मुलगी देवी देखील दिसत आहेत.

बिपाशा करण सिंग ग्रोव्हर आणि मुलगी देवीसोबत बाहेर फिरायला गेली होती. खरंतर, बिपाशा नुकतीच तिच्या कुटुंबासोबत बाहेर गेली होती. यादरम्यान तिने पिवळ्या रंगाचा मिनी ड्रेस आणि ओव्हरसाईज शर्ट घातला होता. तिच्यासोबत असणारा करण पांढऱ्या रंगाचा शर्ट आणि बेज रंगाच्या ट्राउझर्समध्ये दिसत होता. करण बाहेर बिपाशाची वाट पाहत उभा असलेला व्हिडीओमध्ये दिसत आहे. एवढंच नाही तर बिपाशा बाहेर येते तेव्हा ती पती करणसोबत पोज देतानाही दिसत आहे. पण त्यावेळी ती वजनामुळे स्वत:च थोडीशी अवघडल्यासारखी दिसत होती.

व्हिडिओमध्ये बिपाशाचे वजन पूर्वीपेक्षा खूप वाढलेले दिसत आहे. अशा परिस्थितीत, बहुतेक युजर्स कमेंट करताना विचरताना दिसत आहेत की, बिपाशा प्रेग्नेंट आहे का? त्याच वेळी, काहींनी अभिनेत्रीच्या वाढलेल्या वजनावर आश्चर्य व्यक्त केले आहे. काही वापरकर्त्यांना अभिनेत्रीचा ड्रेसिंग सेन्स देखील आवडला नाही, ज्यामुळे वापरकर्त्यांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. एका वापरकर्त्याने कमेंट करत लिहिले 'असे दिसते की ती दुसऱ्यांदा प्रेग्नेंट आहे.' त्याच वेळी, एकाने लिहिले 'बिपाशाची चालण्याची पद्धत थोडी विचित्र वाटतेय का? ती प्रेग्नेंट आहे का?'

बिपाशा आणि करण यांचे लग्न

बिपाशाने २०१६ मध्ये करण सिंग ग्रोव्हरशी लग्न केले आणि सहा वर्षांच्या लग्नानंतर, २०२२ मध्ये या जोडप्याने मुलगी देवीचे या जगात स्वागत केले. बिपाशाचे हे पहिले लग्न असले तरी, करण सिंग ग्रोव्हरचे हे तिसरे लग्न आहे.

# महिलेच्या पोटात बाळ, प्रसुतीकळा सुरु झाल्या पण डॉक्टर दारूच्या नशेत झिंगाट, नाशिकमधील धक्कादायक प्रकार

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील नांदगाव ग्रामीण रुग्णालयात घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे संतापाची लाट उसळली आहे. रुग्णालयातील एका डॉक्टरने मद्यधुंद अवस्थेत कर्तव्यावर असताना प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिलांना ताटकळत ठेवले. या निष्काळजीपणामुळे प्रसंगी गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे शिवसैनिकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी डॉक्टरला चोप दिला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नांदगाव ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी रुग्ण दाखल असतानाही डॉक्टर मद्यधुंद अवस्थेत होते. वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे काही वेळ रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत होती. तर एका महिलेला प्रसुतीकळा देखील सुरु झाल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच शिवसैनिकांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेतली आणि त्यांनी डॉक्टर व कर्मचाऱ्यांना जाब विचारला.

शिवसैनिकांना जाब विचारल्यानंतर एका म हिलेला आधी सिझेरियन (शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती) सांगितलेली असताना प्रत्यक्षात मात्र त्या म हिलेची साधारण प्रसूती झाल्याचे समोर आले. यानंतर संतप्त शिवसैनिकांनी संबंधित डॉक्टरला चोप दिलाय. तर या प्रकरणाची गंभीर दखल घेत सिव्हिल सर्जन डॉ. चारुदत्त शिंदे यांनी संबंधित मद्यधुंद डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान, या घटनेनंतर इतर नागरिकांनीही रुग्णालयातील पूर्वीच्या तक्रारींचा पाढा वाचायला सुरुवात केली आहे. आता मद्यधुंद डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांवर नेमकी कारवाई कधी होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### नांदगाव ग्रामीण रुग्णालयातील इतर तक्रारी

- डॉक्टरांवर ग्रामीण रुग्णालयातील दाखले मिळिवण्यासाठी पैसे घेत असल्याचे आरोप.
- शव विच्छेदन करण्यासाठी देखील एक हजार रुपये नातेवाईकांकडून घेतले जातात.
- डॉक्टर व कर्मचाऱ्यांकडून रुग्णांशी नेहम ीच गैरवर्तणूक केली जाते, उडवाउडवीचे उत्तरे दिली जातात.
- सामान्य प्रसूती ऐवजी सिझेरियन प्रसूतीचा सल्ला दिला जातो.
- रुग्णांना नेहमीच बाहेर रुग्णालयात रेफर केले जाते.
- दुपारी एक नंतर ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर हजर नसतात.
- शासकीय रुग्णालय असतांनाही रुग्णांना बाहेरून खाजगी मेडिकल मधून औषधे आणावयास सांगितले जाते.

असे अनेक आरोप व तक्रारी नागरिकांनी केलेल्या आहेत.

**वणी-कळवण रस्त्यावर अपघात, युवकाचा मृत्यू**

दरम्यान, वणी कळवण रस्त्यावर पायर पाडा फाट्याजवळ पिकअप व मोटारसायकलच्या झालेल्या अपघातात एक युवक ठार तर दोन जखमी झाल्याची घटना घडली आहे. अहिवंतवाडी फाट्याच्या पुढे पायरपाडा फाट्याजवळ असलेल्या वळणावर वणी बाजूकडून येणारी चारचाकी पिकअप क्रमांक (एम.एच. ४१ ए.यु. ८७९८) कळवण बाजूकडे जात असतांना मोटारसायकल कमांक (एम. एच १५ एच.डी.११५४) हीस समोरून धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात म ोटारसायकलवरील तरुण पोपट हिरामण भोये (२५) रा. औताळे यांच्या पोटास मार लागून त्यांच्या पोटातील आतडी तुटून बाहेर येऊन रक्तश्राव होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे सोबत असलेला चुलत भाऊ संदीप संजय भोये व धनराज कृष्णा पालवी हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

### ८५ वर्षाच्या आजोबांना लागले लग्नाचे वेध, पण झालं मोठं कांड, पुण्यात खळबळ

**पुणे/प्रतिनिधी :** आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात एक जोडीदार असावा या भावनेतून एका ८५ वर्षांच्या आजोबांनी लग्नासाठी प्रयत्न केला. त्यांनी आपल्या भावी आयुष्याची स्वप्ने रंगवण्यास सुरुवात केली. पण त्यांना भावी पत्नीचा आयुष्यभरासाठी हाथ मिळवण्याऐवजी थेट फसवणुकीच्या प्रकाराला सामोरे जावे लागले. पुण्यात ही घटना घडली. लग्नाच्या इच्छेने एका ८५ वर्षीय वृद्धाने ज्या स्वप्नांना उराशी बाळगले, त्याच स्वप्नांचा चक्क वापर करून त्यांची लाखो रुपयांनी फसवणूक करण्यात आली आहे. पुण्यातील बिबवेवाडी परिसरातून समोर आलेल्या या अजब आणि धक्कादायक फसवणुकीच्या घटनेने सध्या शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात फसवणूक झालेल्या वृद्ध नागरिकाने एका स्थानिक दैनिकात छापलेल्या विवाहविषयक जाहिरातीतून संपर्क साधला. जाहिरातीत दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करताच समोरून 'आकांक्षा पाटील' नावाची व्यक्ती बोलत असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर वृद्धाकडून 'रजिस्ट्रेशन फी', 'डॉक्युमेंट प्रक्रिया', 'वधू कुटुंबाशी संपर्क' अशा विविध कारणांनी एकूण ११ लाख ४५ हजार ३५० रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करून घेतले गेले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त चंद्रपूर महानगरपालिकेत योगसत्राचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आज सकाळी ७ वाजता विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला शहरातील नागरिक, विद्यार्थी, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी तसेच ज्येष्ठ नागरिक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.






कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर महानगरपालिकेचे आयुक्त यांनी उपस्थितांना संबोधित करत योगाचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक जीवनातील महत्व विशद केले. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, "योग ही भारताची प्राचीन परंपरा असून आजच्या तणावपूर्ण जीवनशैलीमध्ये योग हे आरोग्य टिकवण्यासाठी व मन:शांतीसाठी अत्यंत उपयुक्त साधन आहे. प्रत्येकाने दररोजच्या दिनचर्येत योगाचा समावेश करणे गरजेचे आहे.

पतंजली योग समिती द्वारे प्रशिक्षित योग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने, प्राणायाम व ध्यानसाधना करण्यात आली. यावेळी अनेकांनी पहिल्यांदाच सामूहिक योगासने करून आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या समाप्तीप्रसंगी सर्व सहभागी नागरिकांनी नियमित योगाभ्यास करण्याची प्रतिज्ञा केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग तसेच विविध विभागांचे सहकार्य लाभले.

# केंद्रीय मंत्री जाधव व आमदार खरात यांच्या विकासाचा अजेंडा ; मतदारसंघाचा विकासाला गती देणारा

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी : शासकीय सेवेचा दीर्घकाळ अनुभव असलेले केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व मंत्रालयीन सहसचिव पदावर दीर्घकालीन अनुभव असलेले प्रशासकीय अनुभव असलेले आमदार सिद्धार्थ खरात असे शासकीय व प्रशासकीय अनुभव असलेले लोकप्रतिनिधी मतदार संघाला लाभले आहेत. केंद्रीय मंत्री जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या विकासाचा अजेंडा ही जनतेला माहित आहे. नुकत्याच शहरातील लघू व्यावसायिक आणि अतिक्रमण आरक्षित भूखंडावर श्री शारंगधर बालाजी व्यापारी संकुलातील ३२० दुकानांच्या बांधकामाचे भूमिपूजन केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ही दोन्ही दिग्गज नेत्यांनी विकासाच्या अजेंडावर भाष्य केल्याने मेहकर-लोणार मतदार संघातील रखडलेल्या विकास कामांना गती मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे. नेत्यांचा हा सकारात्मक दृष्टिकोन मतदारसंघाला विकासाला गती देणारा ठरणारा असल्याची चर्चा सर्वत्र होत असून नेत्यांच्या या कार्याबद्दल जनतेकडून कौतुक केले जात आहे.**

## मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाची आशा पल्लावीत



श्री शारंगधर बालाजी संकुलनाच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की,शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेत २५५ व्यावसायिकांचे अतिक्रमण हटविण्यात आले.माझ्या पुढाकारातून नगर पालिकेने व्यापारी संकुल उभारणी करण्याचा निर्णय घेतला.५ कोटी ४१ लाख रुपये खर्चून ३२० गाळ्यांचे अद्ययावत सर्व सुविधायुक्त व्यापारी संकुल बस स्थानकात शेजारील मैदानात उभारण्यात येणार आहे. त्यातील २५५ गाळे अतिक्रमण धारकांना देण्यात येणार असून ६५ गाळे आरक्षणानुसार वितरित करण्यात येणार आहेत.

उदरनिर्वाहासाठी खुल्या जागेवर व्यापारी संकुल उभे करण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. व्यापारी संकुल उभे राहत आहे. याचा आनंद आहे.सर्वसुविधांनी युक्त असे व्यापारी संकुल महाराष्ट्र अर्बन पतसंस्थेमार्फत व नगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मी व माजी. आ. संजय रामुलकर यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शहर विकासासाठी निधी आणला असल्याचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले. तसेच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून हद्दवाढ आम्ही मंजूर करून आणली.त्या भागात रस्ते, नाल्या, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था हे सर्व करण्यात येत आहे. शहरात चौपाटीची स्थापना करण्यात येणार आहे. शहराच्या विविध भागात १७ ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधण्यात येणार आहेत. नगरपालिकेने अतिक्रमण काढताना कुठलाही दुजाभाव करू नये.उर्वरित अतिक्रमण काढण्यात यावे असेही ते म्हणाले. शहराच्या विकासासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य व ताकद दिली पाहिजे,असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

तर, आमदार सिद्धार्थ खरात यांनी, शहरातील अतिक्रमण हटवण्यात आले.त्यामुळे लघू व्यावसायिकांचे रोजगारांवर संकट निर्माण आले. हे संकट दूर करण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला.केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या सहकार्याने अतिक्रमण धारकांना रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी श्री शारंगधर बालाजी संकुल बांधून देण्याचा महत्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला.एकूण ३२० दुकानांपैकी २५५ दुकानांना अतिक्रमणधारक टपरीधारकांना प्राधान्य देण्यात येणार असून उर्वरित दुकानांतून बचत गटातील महिला, विधवा, दिव्यांग यांना संधी दिली जाणार आहे. या गाळ्यांचे लवकरच सुसज्ज रूपात वितरण करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार खरात यांनी दिले.मेहकर शहराच्या विकासासाठी आम्ही नेहमी कटिबद्ध आहोत. या प्रकल्पाच्या माध्यमातून शेकडो कुटुंबांना नवसंजीवनी मिळेल. विकासाच्या आड राजकारण येऊ देणार नाही,'' राजकारण नाही, विकासच माझा अजेंडा आहे.असे मत यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी व्यक्त केले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांनी शहराच्या विकासाचा अजेंडा समोर ठेवून केलेल्या भाष्याने मतदार संघातील विकास गती मिळण्याची अपेक्षा मतदारांकडून व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर केंद्रीय मंत्री व आमदाराच्या सहकार्याने मतदार संघातील सर्वांगीण विकास व्हावा, अशी अपेक्षाही जनतेकडून व्यक्त केली जात आहे.

## विविध वृत्त...

### केंद्रीय राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे सोमवारी दि. २३ जून रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सकाळी ९ वाजता मादणी ता. मेहकर येथे जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी उपस्थिती, सकाळी ११ वाजता ग्रामीण रुग्णालय मेहकर येथे आदर्श ग्रामीण आरोग्य संशोधन केंद्र भूमिपूजन सोहळ्यास उपस्थिती, सकाळी ११.३० वाजता शेतकरी भवन कृषी उत्पन्न बाजार समिती मेहकर येथे जिवतम सुरक्षा योजनेच्या शुभारंभास उपस्थिती तसेच दुपारी १ वाजता दिव्यांग तपासणी व कृत्रिम अवयव वाटप समारंभास उपस्थिती, त्यानंतर सोयीनुसार मातोश्री, शिवाजी नगर, मेहकरकडे प्रस्थान करतील.

### बॉम्ब तयार करताना स्फोट होऊन दोघांचा मृत्यू; एनआयए चौकशी करण्याची भाजपाची मागणी

बीरभूम (कोलकात्ता) : पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यात बेकायदेशीरपणं बॉम्ब बनवताना झालेल्या स्फोटात दोघांचा मृत्यू झाला. ही घटना जिल्ह्यातील लाभपूर पोलिस ठाण्यातील हटिया गावात घडली आहे.

पश्चिम बंगालमधील बॉम्बस्फोटाच्या घटनेला राजकीय वळण लागलं आहे. भाजपाचे बीरभूमचे संघटनात्मक जिल्हा अध्यक्ष ध्रुव साहा म्हणाले, बनावट सोन्याच्या नाण्यांवरून तृणमूलच्या दोन गटांमध्ये वाद झाला आहे. या वादात झालेल्या बॉम्बस्फोटाच्या घटनेची एनआयएनं चौकशी करावी, अशी त्यांनी मागणी केली. शेख साबीर (२६) आणि शेख आलमगीर (१८) अशी मृतांची नावे आहे. बीरभूम जिल्हा पोलिस अधीक्षक अमनदीप सिंह यांनी स्फोटात दोन जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. मात्र, स्थानिकांच्या माहितीनुसार मृतांचा आकडा जास्त असू शकतो. मृतामध्ये एका विद्यार्थ्याचाही समावेश आहे.

बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर तणावाची स्थिती आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी घटनास्थळी मोठ्या संख्येनं पोलीस दल तैनात करण्यात आलं आहे. या घटनेनंतर परिस्थिती नियंत्रणात असल्याचा पोलिसांनी दावा केला. बीरभूममधील लाभपूर येथील हटिया गाव बनावट सोन्याची नाणी विकण्याचं केंद्र म्हणून ओळखले जाते. लोकांना फोन करून आणि त्यांची दिशाभूल करून बनावट सोन्याची नाणी विक्री होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या संदर्भात पोलिसांना अनेक तक्रारीदेखील देण्यात आल्या आहेत. लोकांची फसवणूक टाळण्यासाठी बीरभूम पोलिसांनी जाहिराती करून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.

शुक्रवारी रात्री दोन गटांमध्ये वाद सुरू झाला. त्यानंतर, दोन्ही टोळीतील गुंडांनी गावातील रस्ते आणि शेतांवर अनेक बॉम्बस्फोट केले. यात सत्ताधारी पक्षाचे लोकही सहभागी असल्याचा आरोप आहे. हटिया गावातील तृणमूल बूथ अध्यक्ष शेख नैमुद्दीन आणि त्यांचा सहकारी शेख मुस्तफिर यांच्या गटात झाल्याचा स्थानिकांकडून आरोप करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांच्या हक्कासाठी खास बैठक महावितरण अधिकाऱ्यांसोबत थेट संवाद

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** . मेहकर-लोणार मतदार संघातील शेतकरी व नागरिकांच्या वीजविषयक तक्रारी सोडवण्यासाठी विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक सोमवार, दिनांक २३ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल के. व्ही. प्राईड हॉल, मेहकर येथे पार पडणार आहे. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात हे राहणार आहेत.

या बैठकीसाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहणार असून, शेतकरी व नागरिकांना वीजविषयक समस्या थेट मांडता येणार आहेत.

शेतकरी बांधवांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी आपल्या सर्व तक्रारी दोन प्रतींमध्ये लिहून आणाव्यात.



पूर्वी महावितरणकडे दिलेल्या पण अजूनही निकाली न लागलेल्या तक्रारींसोबत पाठपुरावा व अधिकाऱ्यांनी केलेली कारवाई अथवा दुर्लक्ष याचे पुरावे देखील सोबत आणावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

या बैठकीतून अनेक प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघण्याची शक्यता असून, शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला हक्क मांडावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## बांधावरील झाडं तोडण्यास विरोध केला म्हणून महिलेसह कुटुंबीयांना बेदम मारहाण, आरोपी फरार

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड /प्रतिनिधी :** केज तालुक्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना समोर आल्यानंतर बीड जिल्हा राज्यभरात चर्चेत आला आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांना आळा बसताना दिसत नाही. चोरी, घरफोडी, मारामारी, बलात्कार, छेडछाड आणि लुटमारी यांसारख्या घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. गेल्या काही महिन्यात बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. आता पुन्हा एकदा बीडमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेताच्या बांधावरील झाडं तोडण्यास विरोध केल्याने एका महिलेवर आणि तिच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा प्रकार वडवणी तालुक्यात घडला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, देवळा ते कोरडे वस्ती दरम्यान पायवाटेवर असलेल्या शेताच्या बांधावरील तब्बल ८०-९० वर्षे जुनी लिंबाची झाडं तोडली जात होती. महिलेनं हे झाड तोडण्याबाबत जाब विचारताच, तिला मारहाण करण्यात आली. यावेळी तिचे पती, सासू-सासरे आणि इतर कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले.

यानंतर त्यांनादेखील काठ्यांनी जबर मारहाण करण्यात आली. या प्रकरणी आरोपी बालकृष्ण शिंदे याच्यासह १६ जणांविरोधात वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हक्कावर चाललेली बळजबरी आणि महिलांवरील हिंसाचाराचा हा प्रकार संतापजनक असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी सध्या फरार असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

## मिश्र मार्शल आर्ट्सच्या महिला खेळाडूचे क्रीडा महासंघाच्या अध्यक्षांविरुद्ध लैंगिक छळाचे आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** मिश्र मार्शल आर्ट्सच्या (एमएमए) महिला खेळाडूने क्रीडा महासंघाच्या अध्यक्षांनी लैंगिक छळ केल्याचा आरोप भर न्यायालयात केल्यानंतर उच्च न्यायालयाने या आरोपांची गंभीर दखल घेतली. तसेच आरोपात तथ्य आढळल्यास अध्यक्षांसह इतर संबंधितांवर गुन्हा नोंदवण्याचे आदेश पोलिसांना दिले.

एमएमएआयने भारतीय ऑलिंपिक असोसिएशनची (आयओए) मान्यता मिळावी आणि प्रतिस्पर्धी फेडरेशन मिक्स्ड मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडियाला (एमएएसएएसएफआय) दिलेल्या मान्यतेला स्थगिती द्यावी, या मागणीसाठी केलेल्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित असलेल्या महिला खेळाडूला रडू कोसळले.

न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने या महिला खेळाडूकडे विचारणा केली असताना एमएमएआयच्या अध्यक्षांनी वारंवार लैंगिक छळ केल्याचा आरोप तिने केला.

यावेळी अध्यक्ष आणि तिने इन्स्टाग्रामवरून केलेले संदेशही न्यायालयाला दाखवले. त्यावर समाजमाध्यमावरील हे संदेश लैंगिक संकेत उघड करतात. तसेच, सदर इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप संदेशांना उत्तर देण्यास या महिला खेळाडूला भाग पाडण्यात आले. संदेशांना उत्तर दिले नाही, तर तिला फेडरेशनच्या कोणत्याही खेळात सहभागी होता येणार नाही, अशी धमकी देण्यात आली.

## नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने नाशिकला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांचा विकास होणार : मंत्री गडकरी

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळाच्या निमित्ताने रस्ते विकासासंदर्भातील नागपूर येथे बैठक पार पडली. बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले उपस्थित होते.

नाशिक येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्यासाठी आवश्यक रस्त्यांची निर्मिती व सुविधा केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयामार्फत करण्यास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तत्वतः मान्यता दिली. याबाबत लवकरच डीपीआर करून त्याला निधी उपलब्ध करून दिला जाईल, असा निर्णय बैठकीत





घेण्यात आला. कुंभमेळाप्रती भाविकांची वाढती आस्था व होणारी गर्दी लक्षात घेऊन त्याचे यशस्वी नियोजन, पायाभूत रस्ते विकासाच्या सक्षमिकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना केंद्र शासनाच्या पातळीवर मदत व्हावी, अशी विनंती केली होती.

नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने नाशिकला जोडणाऱ्या सर्व रस्त्यांचा विकास होणार असून भक्तांना अधिक सुरक्षित सुविधा उपलब्ध होतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. बैठकीत नाशिक रिंगरोडला मंजुरी तसेच नाशिक ते त्र्यंबक रस्ता सहापदरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.


## स्थानिक स्वराज्य संस्था एक दिलाने लढणार, महाविकास आघाडीचा निर्धार


**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी एक दिलाने लढणार असल्याचा निर्धार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी २२ जून रोजी बुलढाणा येथील नर्मदा हॉलिडेज येथे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका व जागा वाटप पार्श्वभूमीवर समन्वय बैठकीत केला. बैठकीला महाविकास आघाडीचे नेते

### हॉटेल नर्मदा हॉलिडेज येथे सभा

माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार धीरज लिंगाडे , सौ.जयश्रीताई शेळके,माजी आमदार राहुल बोन्द्रे,माजी आमदार राजुभाऊ एकडे, जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत,जिल्हा प्रमुख प्रसंनजित पाटील, शाम उमाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.यावेळी





माजी आमदार नाना कोरके, काँग्रेस सरचिटणीस श्यामभाऊ उमाळकर, पक्षनेते लक्ष्मणराव घुमरे, छगन मेहेत्रे,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख, प्रा आशिष रहाटे, ॲड साहेबराव सरदार,दत्ता पाटील, नरेश शेळके, वसंतराव भोजने, संगीतराव भोंगळ, ज्योती खेडेकर,, प्रसन्नजीत पाटील, दत्ता पाटील, भास्करराव जाधव, प्रकाश पाटील, अशोक पडघान, दत्तात्रय लहाने, रियाज खान पठाण, संदीप दादा शेळके, नंदू कऱ्हाडे, गजानन वाघ, संतोष रायपुरे, पांडुरंग पाटील यांच्यासह बैठकीला जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.